# प्रकरण ५

# निष्कर्ष - समारोप

BARR. BALASAHEB KHARDEKAR LIBRARY
SHIVAJI UNIVERSITY, KOLHAPUR

=====================================================

## प्रकरण – 5

## निष्कर्ष

=====================================================

सातारा जिल्हा हा शूर, मराठी, कणखर, राकट सरदारांचा व माणसांचा जिल्हा आहे. या जिल्हयाने फार मोठा इतिहास घडविलेला आहे. येथील शूरांनी, सरदारांनी, लोकांनी अनेक लढाया गाजविलेल्या आहेत. परिस्थिती गरीबीची असूनही हा जिल्हा सामाजिक, राजकीय व सांस्कृतिक बाबतीत पाठीमागे कधीच पडलेला नाही. अशा या जिल्हयातील खंडाळा हा तालुका आहे. आजही या तालुक्याच्या परिस्थिती विषयी दुष्काळ ग्रस्त तालुका म्हणून सर्वजण बोलतात आणि ते खरेही आहे. कारण भौगोलिकदृष्टया या तालुक्यात सर्व डोंगर, माळरान असाच भाग आहे. अशा तालुक्यावर सतत वरूणराजाचा कानाडोळा असतो.

अशा या दुष्काळग्रस्त तालुक्यात बहुसंख्येने आढळणारा समाज म्हणजे धनगर समाज होय.

संस्कृत भाषेमध्ये "धांग" असा शब्द आहे. त्याचा अर्थ डोंगर, पर्वत असा आहे. डोंगर पर्वतात राहणारे ते धनगर अशी धनगर शब्दाची उत्पत्ती आहे. याशिवाय हिंदी भाषेत धनगर शब्दाला "गडरीयाँ" म्हणतात. तर कानडी भाषेत "दन" याचा अर्थ जनावरे असा आहे. जनावर म्हणजे मेंढरे, बकरी, गाई व म्हशी तसेच कानडी भाषेतील "गार" किंवा "कार" याचा अर्थ पाळणारे असा आहे. यावरून कानडी भाषेतील "दनगार" किंवा "दनकार" या शब्दावरून, "धनगर" हा मराठी शब्द अस्तित्वात आला असावा असे मत व्यक्त केले जाते. तर धनगर म्हणजे धनाचे आगर अशी ही व्याख्या डॉ.नागनाथ धों. कदम करतात. पण धनाचा साठा किंवा पैसाचासाठा म्हणजे धनगर होय हे म्हणणे तितकेसे बरोबर वाटत नाही. कारण गरीबी, दारिद्रय या समाजाच्या पाचवीलाच पुजलेले आहे. मग धनाचे आगर कसे . हा प्रश्न पडतो.

धनगर समाज म्हणजे सतत भटके, उपेक्षीत जीवन जगणारा, डोंगरदऱ्यात, उघडया माळरानावर राहणारा, कधी उपाशी असणारा, वर्षातील आठ महिने भटकंती करणारा असा हा समाज आहे.

महाराष्ट्रातील धनगर समाजाला भूतकालीन प्राचीन परंपरा, अंधश्रध्दा, रूढी, रितीरिवाज याबद्दल अतिशय अभिमान आहे. 21 व्या शतकाकडे वाटचाल चालू असतानासुध्दा प्राचीन परंपरांची त्याच्या जीवनाभोवती पडलेली मगरमिठी आजतागायत यत्किंचीतही ढिली झालेली नाही. याचे राहून राहून आश्चर्य वाटते. झोपडपट्टी, आदिवासी भाग, मागासलेल्या वसाहती, मागासलेली खेडी येथे आधुनिकतेचे वारे वाहू लागले असतानासुध्दा धनगर समाज मात्र अजूनही भूतकालीन जीवनाची कास धरून आहे. या समाजाच्या हाडीमासी अंधश्रध्दा भिनलेली असून देवदेवतांच्या नावाने बकरी–कोंबडी कापण्यात ते गर्क असतात. शिक्षणाच्या प्रसारामुळे हा समाज सुधारणेच्या दिशेने पहात आहे असा आशावाद निर्माण झाला आहे.)

खंडाळा तालुक्यातील माणसांवर पाऊसाची अवकृपा असली तरी सतत कष्टमय जीवन जगणे असा हा परिसर आहे. भौगोलिक दृष्टया या भागाची स्थिती

"नाही नदी नाही कॅनाल
नाही खळाळत पाणी"

अशी झालेली असते. म्हणून या परिसरातील सर्व शेती ही पावसावर अवलंबून असते. त्यातून पावसाने ओढ दिली तर फक्त आकाशाकडे पाहण्याशिवाय त्यांच्याकडे पर्याय नसतो. त्यामुळे आजपर्यंत या समाजाची आर्थिक परिस्थिती सुधारू शकली नाही. म्हणून हा परिसर साध्या माणसांचा, अडाणी माणसांचा अन्याय सहन करणाऱ्या माणसांचा आहे.

धनगर समाजाची सर्वांगिण प्रगती व विकास साधण्यासाठी पाण्याची उपलब्धता आवश्यक आहे. महाराष्ट्रात सर्वत्र धरणे, तलाव योजना आखून कार्यान्वित झाल्या. हरितक्रांती घडून आली. ऊसाच्या उत्पादनाने शेतकऱ्याच्या आर्थिक परिस्थितीत सुधारणा झालेली असली तरी खंडाळा

तालुक्यात लोणंद परिसरात पाण्याची उणिव असल्यामुळे धनगर समाजाचा सर्वांगिण विकास होवू शकलेला नाही.

खंडाळा तालुक्यातील सर्व परिसर हा डोंगरदऱ्यांनी, दगडगोटयांनी, माळरानांनो व्यापलेला आहे. त्यामुळे शेती कमी आहे. थोडयाशा शेतीवर भागत नाही. म्हणून हा समाज शेळयामेंढया घेऊन कोकणात जातो. त्यामुळे त्याला अनेक अडचणी येतात. मुलांचे शिक्षण, शेती अशा महत्वूपर्ण गोष्टीकडे त्याचे दुर्लक्ष होते. त्यासाठी त्याला शेळयामेंढयांना चारण्यासाठी राखीव कुरणांची आवश्यकता आहे. शासनाने राखीव कुरणे उपलबध करून दिली तर त्याच्या जीवनाला स्थैर्य प्राप्त होईल व भ्रमंती कमी होईल असे प्रयत्न अद्याप झालेले नाहीत असे खेदाने म्हणावे लागते.

खंडाळा तालुक्याला सामर्थ्यशाली ऐतिहासिक परंपरा आहे. किसन वीर, धायगुडे पाटील, अहिल्याबाई होळकर, मल्हाराव होळकर ही राजकीय, सामाजिक क्षेत्रात काम करणारी माणसे या तालुक्याच्या मातीत जन्माला आलेली आहेत व त्यांनी या तालुक्याचा सामाजिक, राजकीय सांस्कृतिक इतिहास घडविला आहे. या तालुक्याचे भौगोलिक परिवर्तन घडविण्याचे भाग्य अद्याप कोणाला लाभलेले नाही. केवळ या भौगोलिक परिस्थितीचे परिवर्तन घडवून आणण्याची येथे अत्यंत आवश्यकता आहे हे या परिसराचा भौगोलिक अभ्यास केल्यानंतर माझ्या लक्षात आले.

लोकगीताचे स्वरूप मौखिक असूनही ते लौकिक जीवनाला गती देते म्हणजेच भूतकालीन जीवनसंदर्भ हे वर्तमानकालीन जीवनसंदर्भाला दिशाच देतात असे मला वाटते.

धनगर समाज हा "आज इथ तर उद्या तिथ" असे जीवन जगत असतो. हजारो वर्षापासून या समाजात रूजलेल्या अंधश्रध्दा एकदम दूर होणार नाहीत. या त्याच्या अंधश्रध्दा दूर करायच्या असतील तर प्रथम त्यांच्या समस्या दूर केल्या पाहिजेत त्यांचे भटके जीवन थांबविले पाहिजे.

इतरांपेक्षा आपण वेगळे आहोत, किंबहुना श्रेष्ठ आहोत अशी या समाजाची भावना आहे. इतर समाजात त्यांना मान नसतो. त्यांना इतर समाज हा हलक्या प्रतीचा समजतो. त्यासाठी या समाजामध्ये शिक्षणाचा प्रसार झाला तर त्यांच्या जातीजातीतला श्रेष्ठ कनिष्ठतेचा भाव कमी होईल. अन्यथा जातीजातीमधील भेदाभेद धनगर समाजाचा विकास घडवू शकणार नाहीत.

(सामाजिक जीवनदर्शन हा लोकसाहित्याचा आत्मा असतो. वास्तव जीवनाचे दर्शन घडविल्याने साहित्याची गोडी वाढते व लोकसाहित्य समृध्द बनते हे आजपर्यंतच्या लोकसाहित्याने दाखवून दिले आहे. पर्यायाने धनगरी गीतांनी धनगर समाजाच्या भावनिक जीवनाचे व वास्तव जीवनाचे परखड दर्शन घडविले आहे. हे संकलित धनगरी लोकगीतातून स्पष्ट दिसते.) सातारा जिल्हयातील राजकीय, सामाजिक, सांस्कृतिक, शैक्षणिक जाणीवा जोपासण्यासाठी खंडाळा तालुक्याने सतत पाठबळ दिलेले आहे. या परिसरातील धनगर शाहीरांनी देशाच्या स्वातंत्र्याचे, क्रांतीचे पोवाडे गायलेले आहेत. म्हणजेच या परिसरातील धनगर समाज हा देश स्वातंत्र्य चळवळीत सहभागी झाला होता हे तितकेच खरे. म्हणजेच राजकीय बदल घडवून आगण्यामध्ये हा परिसर पाठीमागे नव्हता.

/लोकसंस्कृतीतून आपणाला लोकांचे जीवनमान कळू शकते. खंडाळा तालुक्यातील या परिसराने सांस्कृतिक वारसा जतन करून ठेवलेला आहे. सण—समारंभाला, यात्रा—जत्रावेळी अनेक गीतातून हा सांस्कृतिक वारसा दृष्टीस पडतो. भजन, किर्तन, पारायण अशा माध्यमातून लोकमनोरंजन होत असते. प्रत्येक गावातून अशी छोटी मोठी मंडळे किर्तन भजनातून मनोरंजना बरोबर लोकशिक्षणाचे काम करतात.) उदा. पाडळी गावचे ह.भ.प.धायगुडे महाराज, बोरीचे गुलाबभाई पठाण इ. संत ज्ञानेश्वरांची पालखी जेव्हा लोणंदला येते तेव्हा संपूर्ण लोणंद परिसर धार्मिकतेच्या सागरात बुडालेला असतो. सासर आणि माहेर यांना जुडणारा दुवा म्हणजे बोरीचा बार होय. या सणावेळी सासुरवशीणीचे डोळे सतत माहेराला लागलेले असतात. भाऊ कधी येऊन मला घेऊन जातोय आणि नव्या जुन्या मैत्रिणींना कधी एकदा मी भेटेल अशी तिची अवस्था होते.

गजनृत्याची कला तर अनेक सणावाराला मन भरून पाहता येते. यावरून हे सिध्द होते की, लोकसाहित्य हे लोकसंस्कृतीला समृध्द करीत असते.

निरक्षरांना साक्षर बनविण्यासाठी हा तालुका सतत परिश्रम घेत आहे. प्रौढांसाठी रात्रशाळा, वेळ मिळेल तेव्हा शिक्षण देण्याचे काम चालू आहे.

लोकसाहित्यातील लोकगीते विशेषत: धनगरी गीते परिणामकारक व प्रत्ययकारक आहेत असे संकलीत धनगरी गीतावरून माझ्या लक्षात आले.

समाजाची उंची ही शिक्षणावर अवलंबून असते. हा आजपर्यंतचा सर्व अभ्यासकांचा, विचारवंताचा अनुभव आहे. कर्मवीर भाऊराव पाटील, मा.शंकरराव गाढवे सर इ. लोकांनी केलेल्या शैक्षणिक प्रसारामुळे व शैक्षणिक कार्यामुळे या तालुक्याला शिक्षण घेता येऊ लागले आहे. स्वत: मी लोणंद परिसरातील खंडाळा विभाग शिक्षण संस्थेच्या पंचक्रोशी विद्यालय पाडळी सुखेड बोरी या विद्यालयात शिक्षक आहे.

औद्योगिकदृष्टया हा परिसर मागासलेलाच आहे. संपूर्ण वैराट माळरान असल्याने पुढे या परिसरात मोठ मोठे उद्योग सुरू होतील. कारण लोणंद ही कांद्याची प्रसिध्द बाजारपेठ आहे. विविध मालाच्या बाजारपेठेची जोड दिली तरच हा परिसर आर्थिकदृष्टया सबल होईल. सूतगिरण्या, लोकरीचा उद्योगधंदा, दगडाच्या खाणी, डोंगरकपारीत फळफळावर इ. ची लागण, वृक्ष लागवड असे अनेक उपक्रम राबविले तर या तालुक्याचा आर्थिक विकास वाढेल असे मला या अभ्यासावरून स्पष्ट दिसते. त्यासाठी महाराष्ट्रातील असे दुष्काळी तालुके शासनाने औद्योगिकदृष्टया पुढे आणण्याचे प्रयत्न करण्याची येथे गरज आहे.

महाबळेश्वर हे प्रेक्षणीय स्थळ आहे. ती दृष्टी ठेवून महाबळेश्वर सारखा जर हा भाग केला तर पर्यटनस्थळ होईल. म्हणजेच "सुंदर पुणे तसे सुंदर खंडाळा" होण्याचे प्रयत्न आवश्यक आहेत. याकामी शासनाने आणि समाजाने लक्ष केंद्रीत करावे.

पं.जवाहरलाल नेहरूंनी पंचवार्षिक योजना आखून धरणयोजना यशस्वी करून शेतकऱ्याचे जीवनमान बदलविले. हरितक्रांती घडवून आणली. उदा.कोयना, धोम, कण्हेर या धरणांमुळे कायापालट झाला. तशाप्रकारे अनेक डोंगर योजना, धरण योजना आखल्या पाहिजेत आणि डोंगर सुध्दा पर्यटन स्थळे बनवावीत असे लोकगीताच्या अभ्यासामुळे मी या निष्कर्षाप्रत आलो.

लोणंद परिसरातील लोकांच्या रक्तात भिनलेली गोष्ट म्हणजे धार्मिकता, खंडोबा, बिरोबा अशा परमेश्वरासमोर नतमस्तक होणे त्याला आवडते. भांडण झाले की तो मंदीरात जाऊन त्याचे पाय धरून त्यातून सोडवणूक करून घेण्याची देवाला विनंती करतो. दु:ख समोर आले की तो देवाचा धावा करतो. एकंदरीत या परिसरात धार्मिकतेचे प्रमाण अधिक आहे कारण साधा व भोळाभाबडा माणूस देवासमोर नतमत्सक होतो आणि देवदर्शनातून त्याला जीवन जगण्याचा एक मार्ग सापडतो.

निष्कर्ष हाच की वास्तव जीवनाला भावनिकतेचा स्पर्श दिल्यास, येईल त्या जीवनाला सामोरे जाण्याची ताकद निर्माण होते. या परिसरातील धर्मभावनेमुळे धनगर लोक खडतर जीवनाला सहजपणे सामोरे जाऊ शकलेले आहेत.

अशाप्रकारे खंडाळा तालुक्याचा परिसर भौगोलिक, सामाजिक, ऐतिहासिक, राजकीय, सांस्कृतिक, साहित्यिक, शैक्षणिक, औद्योगिक व धार्मिकतेने नटलेला व सजलेला आहे. समाजाच्या बौध्दिक, मानसिक, शारिरीक ताकतीवर लोकशाही प्रणाली यशस्वी होत असते याचा प्रत्यय या परिसरात येतो.

दुसऱ्या प्रकरणामध्ये लोकसाहित्याच्या स्वरूप व वैशिष्टयांची चर्चा आणि लोणंद परिसरातील धनगरी लोकगीताचे स्वरूप वैशिष्टये पाहिलेली आहेत.

लोकसाहित्याचा अभ्यास प्राचीन काळापासून होत आलेला आहे. पण तो अलिखित स्वरूपात होत. परंतु 16 व्या, 17 व्या शतकात इंग्लंडमध्येच या अभ्यासाला सुरवात होऊन लोकसाहित्याची संकल्पना व्यापक बनण्यास मदत झाली.

लोकसाहित्य या संज्ञेची संकल्पना दुसऱ्या प्रकरणामध्ये मांडली. पाश्चात्य व भारतीय संशोधकांच्या विचाराधारे मांडली आहे. लोकसाहित्याला पर्यायी शब्द म्हणून "लोकसंस्कृती" ठरणारा असून लोकसाहित्यात लोकसंस्कृतीला अग्रस्थान दिले आहे.

महाराष्ट्रात लोकसाहित्याचे संकलन व लोकसाहित्याचे लेखन सन 1858 पासून सुरू झाले आहे. आणि लोकसाहित्यातील निरनिराळया साहित्य प्रकारांना पारिभाषिक संज्ञा सन 1915 पासून वापरण्यात आल्या.

लोकसाहित्य म्हणजे "लोकांनी, लोकांच्यासाठी लोकभाषेत लिहिलेले साहित्य" होय. लोकसाहित्याला 'Folklore' असा शब्दप्रयोग वापरून त्याच्या संकल्पनेत कथागीते, म्हणी, उखाणे, स्त्रीगीते या बरोबर लोकदेवता, लोकसमजुती, लोककला, व्रतवैकल्ये, लोकभ्रम अशा घटकांचा समावेश होतो. लोकसाहित्यिकांनी लोकसाहित्याविषयी अनेक पारिभाषिक संज्ञा वापरल्याने लोकसाहित्याचे स्वरूप समजण्यास मदत झाली. आणि साहित्याचे महत्त्व लोकांच्या मनावर बिंबवणे सोपे झाले. साने गुरूजी, रविंद्रनाथ टागोर यांनी लोकसाहित्याविषयी केलेले लेखन फार मौलिक वाटते. लोकसाहित्य हे लोकांच्या जीवनातून निर्माण होत असते. हे जीवन अनादीकालापासूनचे आहे. हे लक्षात घ्यावे लागते. म्हणजेच लोकसाहित्याची परंपरा प्राचीन असून ती ऋग्वेद काळाइतकी जुनी आहे.

लोकसाहित्यात जनसामान्यांचे रितीरिवाज, राहणी, अंधश्रध्दा, रूढी, परंपरा, धर्म इ. विषयीचा विचार व भावना मौखिक स्वरूपात व्यक्त होतात. अशा या लोकसाहित्याच्या निर्मितीमागे सामूहिक मन असलेले आढळते. म्हणून लोकसाहित्य अखंडपणे चालणारी व टिकून राहणारी मौखिक परंपरा आहे हे तितकेच खरे.

लोकसाहित्याच्या स्वरूप वैशिष्टयावरून, व्याख्यावरून त्याची व्यापक संकल्पना लक्षात येते. त्याचबरोबर लोकसाहित्याच्या निर्मितीची प्रयोजनेही फार महत्वाची वाटतात. कारण लोकसाहित्याची भाषा साधी व लवचिक असते. लोकसाहित्यात सामूहिक मनाची सामूहिक

आविष्कृती असते. त्यामुळे असे म्हणावे वाटते की – लोकसाहित्य हे एकटया दुकटयाचे कधीच नसते ती समाजाची मालमत्ता असते.

लोकसाहित्य हे गद्यपद्य मिश्रीत असते. त्यातील माझ्या अभ्यासाचा विषय पद्याचा असल्यामुळे मी त्यातील भावनिक आविष्कार व त्यात प्रतित होणारे वास्तव जीवन याचा अभ्यास केला आहे व धनगरी लोकगीतातील रसास्वादाचे स्वरूप स्पष्ट केले आहे व त्यात लोकगीताची वाड्.मयीन गुणवत्ता स्पष्ट केली आहे. लोकगीतांना मानवी उगमापासूनची परंपरा प्राप्त झाली आहे. हे इतर विचारवंतांनी स्पष्ट केले आहे.

धनगरी गीते अशा या लोकगीताचा एक भाग आहेत. लोकगीताचे वाड्.मयीन वैभव हा एक साहित्यातील अमोल ठेवा आहे. व तो एका पिढीकडून दुसऱ्या पिढीकडे अव्याहतपणे प्रवाहीत झाला आहे.

धनगर समाज हा एक भटका समाज म्हणून ओळखला जातो. मेंढया पाळून आपल्या जीवनाचा उदरनिर्वाह करणे यात तो सतत मग्न असतो. त्याचे जीवन ऊन, वारा, पाऊस, काळोख याच्याशी संबंधीत असते. त्यामुळे त्याला सतत जागे रहावे लागते. अनेक कठीण प्रसंगांना तोंड द्यावे लागते. तो पाठीमागे न पाहता येणाऱ्या अडचणीवर मात करतो.

अशा या भटक्या जमातीचा अभ्यास अनेक देशांनी केलेला आहे. उदा. ऑस्ट्रेलिया, इंग्लंड, न्यूझीलंड इ. या सर्वच देशात मेंढपाळ हा व्यवसाय फार मोठया प्रमाणात चालतो. धनगराने तयार केलेल्या लोकरीच्या वस्तूंना तर आंतरराष्ट्रीय बाजारपेठेत खूप मागणी असते.

लोकगीत हे खेडोपाडयातील अडाणी साध्या लोकांचे "हृदयगीत" असते. ही ना.धो.महानोर यांची व्याख्या अधिक पटते. कारण खेडोपाडयातील लोक अशा गीतांना फार जपतात. त्यांना हृदयात स्थान देतात. या लोकांच्यापासून लोकगीते वेगळी केली तर शीर नसलेल्या धडासारखी माणसाची अवस्था होईल. अशी ही लोकगीतं व लोकसाहित्य या एकाच नाण्याच्या दोन बाजू आहेत. त्यामुळे त्याच्यातील स्वरूपाची एकरूपता लक्षात येते.

लोकगीतांच्या आविष्काराने व रसास्वादाने मानवी भावभावनांना स्पर्श होतो व या उपेक्षीत राहिलेल्या वाड्.मयाचे आकर्षण वाढते.

तिसऱ्या प्रकरणामध्ये संकलीत धनगरी लोकगीताचे रसास्वादात्मक विवरण केलेले आहे. त्यामध्ये धनगरी लोकगीताचा समाजशास्त्रीय दृष्टीकोनातून अभ्यास केलेला आहे. त्यामध्ये धनगरी गीते ही लोकसाहित्याचे एक अंग असल्याचे दिसून येते. वास्तवजीवन दर्शन हा लोकसाहित्याचा आत्मा असतो. हे लक्षात येते. लोकगीतांना मानसशास्त्र व समाजशास्त्र यांची भक्कम बैठक लाभलेली आहे हे तितकेच खरे. लोकजीवनाचा व्यापक अर्थाने विचार केला तर लोकसाहित्य व लोकजीवन यांचा फार जवळचा संबंध आहे हे स्पष्ट होते. परिणामत: लोकजीवनाचा अभ्यास हा लोकसाहित्याचा अभ्यास ठरतो. लोकसाहित्यात लोकजीवनाचेच पडसाद उमटलेले असतात. लोकसाहित्याला लोकजीवनापासून अलग करता येणार नाही. कारण लोकांनी प्रत्यक्ष जगलेले जीवन म्हणजे लोकसाहित्य होय.

काळाबरोबर समाजजीवनात अनेक परिवर्तने घडत असतात. त्यामुळे लोकसाहित्यातही परिवर्तनशिलता आढळते. लोकसाहित्यात परिवर्तनशिलता असली तरी भूतकालीन जीवनाचे अवशेष नष्ट होत नाहीत. जुन्या मूल्याचा अभ्यास करून नविन मूल्य आत्मसात करणे हा लोकसाहित्याचा कणा आहे.

लोकसाहित्यातील समाज हा भोवतालच्या वातावरणाशी परिसराशी बांधलेला असतो. तसाच या परिसरातील धनगरी समाजही आहे. सततच्या भटक्तीत तो स्थानिक पातळीवरचे जीवनमान, कला, राहणीमान आत्मसात करतो व नविन बदल घडवून आणतो. काळाबरोबर बदलत राहणे हा या समाजाचाही नियम आहे.

लोणंद परिसरातील सर्व स्त्रिया आपल्या घराबद्दल, पतीबद्दल, मुलाबाळाबद्दल परमेश्वराला सुखी ठेवण्याची विनंती करतात. अनेक सणावाराला, दळणकांडण करताना आपला कुटुंब कल्याणाचा भाव त्या ओवीतून व्यक्त करतात. अशा या धनगरी गीताचा अभ्यास म्हणजे लोकसाहित्य होय. असे हे लोकसाहित्य समाजशास्त्राच्या अभ्यासाचे एक साधन आहे.

समाजशास्त्रीय दृष्टीकोनातून लोकसाहित्याचा विचार केल्यास अनेक प्रकारचे भावजीवन लोकसाहित्यात प्रकट झालेले असते हे दिसून येते.

लोकसाहित्य ही एक कला आहे. अशा कलेतून माणूस हा एकत्र येतो. म्हणजेच माणूस एकत्र आणण्याचे साहित्य म्हणजे लोकसाहित्य होय. म्हणजेच या परिसरातील गीतांनी पर्यायाने लोकसाहित्याने मराठी लोकसाहित्याची कुस बळकट केली आहे यात शंका नाही. अशाप्रकारे धनगरी महिलेच्या मुखातून पाझरलेली गीते म्हणजेच भावगीते होत. कारण अशा गीतातून स्वतःची सुखदुःखे, स्फूर्ती, प्रेरणा देण्याचे काम ती व्यक्त करते. म्हणून लोकसाहित्य हे सामाजिक आदर्श दाखवून देते. अशा लोक आदर्शाची जपणूक होणे महत्वाचे आहे. असे सामाजिक आदर्श टिकवून ठेवण्यासाठी लोकसाहित्याची जपणूक व्हायला पाहिजे. म्हणून या धनगरी गीतांचा अभ्यास मी केला आहे. अशा या धनगरी गीतांना संकलीत करून त्यांना ग्रंथरूप देण्याचा माझा प्रयत्न आहे. कारण या गीतातून व्यक्त झालेले देवभाव, व्यक्तीभाव व कलाभाव आजही वाचकांच्या मनाचा वेध घेतात.

लोणंद परिसरातील स्त्री–पुरूषांना राधा–कृष्ण, विठ्ठल–रूक्मिणी, खंडोबा–बाणाई, राम–सीता, याबद्दल कमालीचा आदर आहे. यातून एकमेकाविषयीचा प्रेमभाव, सहकार्यवृत्ती वाढीस लागण्यास मदत होते. पूर्वीच्या व सद्याच्या संस्कृतीवर लोकसंस्कृतीचा प्रभाव परंपरेने पडत असलेला दिसून येतो.

तमाशा असो अगर किर्तन असो अगर गजनृत्य असो या सर्व स्तरामध्ये लोकसंस्कृतीचा प्रभाव पडलेला आढळतो. कृषीगीते, विधीगीते, डोहाळे, पाळणे, लग्नसमारंभातील लोकगीतातून लोकसंस्कृतीचे दर्शन घडते.

समाजशास्त्रीय दृष्टीकोनातून लोकगीताचा विचार केला तर लोकगीतांचा कृती उक्तीशी घनिष्ठ संबंध असतो. समाजजीवनाचा अभ्यास हा सामाजिक अंगाने होणे फार महत्वाचे असते. याचा अर्थ लोकवाङ्मयाची निर्मिती ही लोकजीवनातूनच होत असते.

धनगरी लोकगीताच्या विविध आविष्काराचे वाङ्‌मयीन विवेचन करताना या परिसरातील लोकांनी, मौखिक परंपरेने जतन करून ठेवलेल्या ओव्या व गीते पाहणे महत्वाचे आहे. या लोकगीतात स्त्री–पुरूषांच्या कथा, आख्यान, देवदेवतापर गीतांचा समावेश होऊ शकतो. धनगर पुरूष गीताचे वैशिष्टये म्हणजे "सुंबरान मांडील, सुंबरान मांडील" या गीताने परमेश्वराची आळवणी सुरू होते. या पुरुषगीतात नृत्य, नाच याला महत्व असते. तसेच त्याला वाद्याची साथ लागते. ठेका, ताल तर अतिशय महत्वाचा असतो. पुरूषगीतात गजनृत्याची गीते, भाकणुकीची गीते, संध्याकाळची गीते, देवांची गीते, यात्राविषयक गीते, पोवाडे, लावणी यांचा समावेश केला आहे. अशा या सर्वच गीतातून आपल्यावर येणारी संकटे, सुखदु:खे यातून तो मार्ग काढण्यास पर्याय शोधतो. त्याचे हे जीवन सुखी करण्याचा मार्ग महत्वाचा वाटतो. यातून त्याची परमेश्वरावर असणारी भोळी–भाबडी श्रध्दा दृष्टीस पडते.

लोकगीतामध्ये स्त्रियांनी प्राचीन काळापासून स्त्रीगीतांचा अमोल ठेवा जपलेला आहे. स्त्री ही जीवनातील भले–बुरे अनुभव हळुवार अंत:करणाने, सहज सुलभपणे मांडू शकते. म्हणून लोकसाहित्यातील एक महत्वाचा घटक म्हणून लोकगीतांना ओळखावे लागेल म्हणून म्हणावेसे वाटते की, स्त्रीगीते ही मनाला चटका लावतात व भुरळ पाडतात.

स्त्रीगीते ही महाराष्ट्रीय स्त्रीची भावगंगा असून त्यात महाराष्ट्रीय स्त्रीची गाथाच गोवलेली आहे. ही स्त्रीगीते एका पिढीकडून दुसऱ्या पिढीकडे जातात. स्त्रीच्या मनपटलावर उमटणाऱ्या अनेक घटकांचा आलेख स्त्रीगीतात दिसून येतो. अशी ही ग्रामीण भागातील स्त्री पावित्र्याला व श्रध्देला फार जपते. देवाधर्मावर तर तिची अपार श्रध्दा असते. आपल्या मनातील भाव ती सणावाराला, जात्याबरोबर बोलताना व्यक्त करते. सीता–सावित्री, चांगुणा, द्रौपदी या चारित्र्यवान स्त्रियांचे दाखले ती इतरांना देते. यावरून अशी ही अडाणी साधी भोळी स्त्री समाजालाच चांगल्या वागणुकीचे धडे देत असते. अशा या स्त्रीगीतामध्ये जात्यावरच्या ओव्या, लग्नविषयक, देवदेवतांची गीते, आणे–उखाणे यांचा समावेश केलेला आहे. आपल्या मनातील भाव

ती या माध्यमातून व्यक्त करते. मनोरंजनाबरोबर लोकशिक्षणाचे धडे ती इतरांना देते. सर्वांना सुखी ठेवण्याचे आव्हान ती परमेश्वराजवळ करते. इतरांच्या बरोबर आपण कसे वागावे हा महत्वाचा निष्कर्ष यातून आपणाला कळतो. यावरून असे म्हणावेसे वाटते की स्त्रियांनीच खऱ्या अर्थाने समाज जागृत ठेवला आहे व समाजात सत्यता टिकवून ठेवली आहे.

अशा अनेक गीतातून आपल्या संसार सुखाला, जिवाभावाच्या माणसांना ती शब्दबध्द करते. अशी या परिसरातील गीते मनाला भिडणारी रोचक व सरस आहेत.

बालगीते ही काळाबरोबर बदलून स्वतःचे असे एक विश्व निर्माण करतात. ते लडीवाळपणाचे विश्व असते. त्यातून त्यांना आनंद मिळतो.

तिसऱ्या भागामध्ये लोणंद परिसरातील धार्मिक कुलाचार यामध्ये देवदेवता, सण, व्रते यांचे महत्व लक्षात येते. धनगर समाजाचा ओघ पूर्वीपासून आजपर्यंत कधीही थांबलेला नाही. तो सतत प्रवाहीतच आहे. त्याच्या जीवनाच्या भ्रमंतीत आचार-विचार विधीचे अखंडत्व कधीच खंडीत झाले नाही हे येथे स्पष्ट होते. परमेश्वरावर त्याची अपार श्रध्दा आहे. ही श्रध्दा तो अनेक सणा-वाराला, व्रतवैकल्ये करून व्यक्त करीत असतो. देवाला शरण जाण्याचा भक्तीभाव त्याच्याकडेही आहे. त्यासाठी तो आपल्या मनाला शुध्द करण्याची धडपड करीत असतो. अंतरात्मा हाच परमेश्वर तो मानत आहे. तो प्रपंच व परमार्थ यांचा संबंध घडवून आणतो. त्यामुळे लोकसाहित्यात नितीचे दर्शन घडते. म्हणून म्हणावेसे वाटते की, लोकसाहित्य हा आमच्या जीवनाचा स्वच्छ आरसा असतो.

यानंतर चौथ्या भागात खंडाळा तालुक्यातील निवडक देवदेवताच्या कथा विस्ताराने स्पष्ट केल्या आहेत. यामध्ये खंडोबा, बिरोबा, वाग्देव, मस्कोबा या देवांना या परिसरात विशेष महत्व असल्याने या देवांच्या कथा घेतलेल्या आहेत. यातून परिसरामध्ये या देवांची उत्पत्ती कशी झाली व त्यांनी शत्रूला मारून जनमानसावर आपला ठसा कसा उमटविला याची प्रचिती येते व त्यांच्या पराक्रमाबद्दल आपणही दोन्ही हात जोडून त्याच्यासमोर नतमस्तक होतो हेच खरे.

साहित्याने लोकजीवनापासून दूर जावू नये. जर साहित्य जीवनापासून दूर गेले तर मनोरंजन व लोकशिक्षण घडणार कसे ! म्हणून परंपरेने चालत आलेले लोकसाहित्य हे मानवी जीवनाबरोबरच असलेले पाहावयास मिळेल. म्हणजेच मानवी जीवन व लोकसंस्कृती यांचे नाते अतुट आहे.

चौथ्या प्रकरणामध्ये खंडाळा तालुक्यातील लोणंद परिसरातील धनगरी लोकगीते व लोकसंस्कृती यांचे बंध अनुबंध स्पष्ट केले आहेत.

मानवाला आपल्या मन व बुध्दिवर विजय मिळविण्यासाठी निसर्गाशी मैत्री ठेवावी लागते. त्यावेळी त्याच्या स्वत:च्या मन बुध्दीवर संस्कार होत असतात. संस्कृती ही एका पिढीकडून दुसऱ्या पिढीकडे सतत जात असते. धनगरी लोकगीते ही अशाच प्रकारची आहेत. या परिसरातील माणसाने "जुन ते सोनं" स्विकारीत असताना नविन पध्दतीकडे दुर्लक्ष केलेलं नाही.

संस्कृतीमध्ये मानवाचे संपूर्ण जीवन असते. या परिसरातील लोक आपल्या कुलदैवताची पूजा करण्यात सतत मग्न असतात. निरनिराळया जत्रा–यात्रावेळी तो आपल्या मनातील भाव व्यक्त करतो. धनगरी गीते ही सांस्कृतिक इतिहास जपून ठेवत असतात. म्हणजेच धनगरी गीते ही लोकसाहित्याचा एक महत्वाचा भाग आहेत. अशी ही धनगरी गीते लोकसंस्कृतीशी एकनिष्ठ असलेली आढळतात.